# स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिला प्रतिनिधींचा राजकीय निर्णय प्रक्रियेत सहभाग (विशेष संदर्भ, यवतमाळ जिल्ह्यातील नगरपालिकेतील महिला प्रतिनिधींचा अभ्यास) (२००६ ते २०१६ या कालखंडातील अभ्यास)

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या कला विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी प्रस्तुत करावयाचा संशोधन आराखडा**

**संशोधक**

**कु.भुतडा शितल भागीरथजी**

क.म.शिक्षक

गो.सी.गावंडे क.महाविद्यालय, उमरखेड

**संशोधन केंद्र**

पीपल्स कॉलेज, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**मार्गदर्शक**

**डॉ.व्ही.एल.एरंडे**

प्राचार्य, महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा

**शैक्षणिक वर्ष**

**नोंव्हेबर २०१७**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विवरण | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | |
| २ | संशोधन विषयाची निवड | |
| ३ | संशोधनक्षेत्र आणि संशोधनाचा कालखंड (२००६-२०१६) तीन निवडणुकांचा अभ्यास | |
| ४ | संशोधन अभ्यासाची उद्दिष्ट्ये | |
| ५ | संशोधन साहित्याचा आढावा | |
| ६ | संशोधन पध्दती | |
| ७ | संशोधनाचा आराखडा | |
| ८ | संदर्भ सुची | |

## १. प्रस्तावना:-

भारतातील लोकशाहीचा इतिहास प्राचीन असून तो रामायण काळापासूनच चालत आलेला आहे. राम हा राजा असतानाही तो जनमाणसाला मान देऊन राज्यकारभार चालवित होता. म्हणूनच महात्मा गांधीजी म्हणतात की, "माझी लोकशाहीची कल्पना ही रामराज्याची कल्पना आहे". [१]

संसदीय लोकशाही असलेल्या आपल्या देशात स्त्री-पुरूष यांचे सत्तेतील सहभागाच्या प्रमाणात संतूलन असणे आवश्यक आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या साठ वर्षात भारतीय स्त्रियांनी शिक्षण घेऊन शासकीय नौकरी, उद्योग व्यवसाय, क्रिडा, सुरक्षायंत्रणा, खाजगीक्षेत्रे इ.अनेकक्षेत्र स्वबळावर काबीज केली आहेत. भारतीय स्त्रियांचा प्रत्येक क्षेत्रात एक खास ठसा उमटलेला आढळतो.

भारतीय स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात यशाचे शिखर गाठत असताना राजकीय क्षेत्रातील सहभागाबाबतचे आजचे चित्र मात्र पूर्णपणे वेगळे आणि पुरातनवादी विचारांच्या प्रभावाचेच आढळते. राजकीय क्षेत्रात स्त्रियांचा राजकीय निर्णय प्रक्रियेतील सहभाग अत्यल्पच आढळतो.

पंतप्रधान राजीव गांधी सरकारने २० एप्रिल १९९२ रोजी संमत केलेल्या ७३ वी आणि ७४ व्या घटना दुरूस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली. या तरतूदी पश्चात ग्रामीण व शहरी भागातून स्त्रियांच्या सहभागात संख्यात्मक वाढ झालेली आढळून येते. आरक्षणाच्या माध्यमातून ग्रामीण/शहरी महिलांना प्रक्रियेत सहभागी करुन घेणारा भारत हा जगातील एकमेव देश आहे. या पार्श्वभुमिवर संशोधकाने स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिला प्रतिनिधींचा राजकीय निर्णय प्रक्रियेतील गुणात्मक सहभाग या विषयातंर्गत यवतमाळ जिल्ह्या आठ नगरपालिकांतील महिला प्रतिनिधींचा राजकीय निर्णय प्रक्रियेतील सहभाग, त्याचबरोबर महिला प्रतिनिधींनी

केलेली विकासात्मक कामे आणि एकंदरित सभागृहावर पाडलेला प्रभाव याबाबत अध्ययन करुन कांही निष्कर्षापर्यंत जाता येते का या समस्येला अनुसरुन संशोधन विषयाची निवड केलेली आहे. महिलांचा संख्यात्मक सहभाग वाढला मात्र गुणात्मक सहभाग फारसा निर्माण होऊ शकला नाही असे गेल्या दोन दशकात बोलले जाते. तेंव्हा याबाबत देखील राजकीय निर्णय प्रक्रियेत स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिला कितपत प्रगल्भ झालेल्या आहेत हे तपासून संशोधनाला एक दिशा देण्याचा प्रयत्न प्रस्तूत प्रकल्पाच्या माध्यमातून पुर्ण केला जाईल. सर्वसाधारणपणे स्थानिक स्वराज्य संस्थातील महिलांच्या निर्णय प्रक्रियेत फारसा सहभाग नाही. पुरुषप्रधान मानसिकता असल्यामुळे महिला प्रतिनिधी आपला फारसा प्रभाव सभागृहात व सभागृहाबाहेर पाडू शकल्या नाहीत असाही अभ्यास झालेला आहे. तेंव्हा या दोन्ही बाजू लक्षात घेऊन यवतमाळ जिल्ह्यातील नगरपालिका व तेथील महिलांच्या सक्रीय राजकीय सहभागाचे तटस्थपणे मुल्यमापन व चिकित्सा करणे हे या संशोधनाचे प्रयोजन आहे.

**अध्ययन विषयाची निवड :-**

स्थानिक शासनव्यवस्था हा विषय भारतीय संविधानातील राज्यसुचित समाविष्ठ केला असून त्या बळकट करण्यासाठी केंद्रशासनाने सुरवातीपासूनच पुढाकार घेतला आहे. केंद्रसरकार व राज्यसरकार यांनी मिळून १९५७ मध्ये बलवंतराय मेहता समिती, (१९६०) वसंतराव नाईक समिती, (१९७०) एल.एन. बोगींनवार समिती, (१९७७) अशोक मेहता समिती व १९९४ मध्ये प्राचार्य पी.बी. पाटील समिती इ.समित्यांची स्थापना केली.

नगरपालिका, महानगरपालिका व स्थानिक स्वराज्य संस्था यांना मजबुती प्रदान करण्याची आवश्यकता या समित्यांच्या अहवालातून स्पष्ट करण्यात आली. पुढे डिसेंबर १९९२ मध्ये ७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरूस्तीचे विधेयक

लोकसभेत मांडण्यात आले. त्याच महिन्यात राज्यसभा व निम्म्यापेक्षा अधिक घटकराज्यानी ते विधेयक संमत केले. राष्ट्रपतीच्या स्वाक्षरीने हे विधेयक २० एप्रिल १९९३ रोजी संविधानाच्या कलम २४३ मध्ये 'ए' ते 'ओ' या कलमांतर्गत समाविष्ठ करण्यात आले. या घटनादुरुस्तीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना निवडणुकांत आरक्षण देण्याची तरतूद करण्यात आली.

७३ व्या घटनादुरूस्तीच्या अनेक उद्दिष्टापैकी एक प्रमुख उद्दिष्ट्ये होते की, महिलांचा राजकीय सहभाग वाढला पाहिजे. ७३ वी घटनादुरूस्ती जया उद्देशाने करण्यात आली आहे तो उद्देश पूर्ण झालेला आहे काय? स्थानिक स्वराज्य संस्थेअंतर्गत सत्तेचे विकेंद्रीकरण खरेच झाले का? आरक्षणाच्या माध्यमातून निर्माण होणा-या नेतृत्वाचे वस्तुनिष्ठ व यथार्थवादी अभ्यास व्हावा या हेतूने संशोधनासाठी २००६ ते २०१६ या दहा वर्षातील यवतमाळ जिल्ह्यातील नगरपालिकातील महिलांचा राजकीय निर्णय प्रक्रियेतील सक्रिय सहभागाचा चिकित्सक अभ्यास करण्याचा प्रयत्न राहील.

**संशोधन क्षेत्र  व संशोधनाचा कालखंड :-**

७३ वी ७४ व्या घटनादुरूस्ती नंतर देऊन महिलांना स्वराज्य संस्थातील महिलांना ३३ टक्के आरक्षणदेऊन महिलांना राजकीय सहभागास प्रोत्साहन देण्यात आले. महाराष्ट्रातील यवमतमाळ हा जिल्हा क्षेत्रफळाच्या दृष्टीने दुसरा मोठा जिल्हा आहे. यवतमाळ जिल्ह्यामध्ये एकूण ८ नगरपालिका व २ नगरपंचायत आहेत. यवतमाळ, पुसद,वणी, द्वारव्हा, डिग्रस,पांढरकवडा, उमरखेड, घाटंजी या तालुका व जिल्हास्तरावर नगरपालिका असून नेर आणि आर्णी मध्ये नगरपंचायत आहेत. एकूण  ८ पैकी ५ नगरपालिकांचे अध्यक्षपद हे महिलांसाठी राखीव असून उमरखेड आणि द्वारव्हा मध्ये २०११ च्या नगरपालिका अध्यक्षपद महिलांसाठी राखीव होते.

अभ्यासविषयाचा प्रमुख उद्देश महिलांचा राजकिय निर्णय प्रक्रियेत सक्रिय सहभागाचा अभ्यास असल्यामुळे २००६ ते २०१६ च्या दहा वर्षाच्या कालावधीतील यवतमाळ जिल्ह्यातील नगरपालिकेचा महिला सदस्य व नेतृत्वाचा अध्ययन केले जाणार आहे.

**संशोधन अभ्यासाची उद्दिष्ट्ये :-**

१९९३ मध्ये झालेल्या ७३ व्या व ७४ व्या घटनादुरूस्ती नंतरदेशातील स्थानिक स्वराज्य संस्थातील नगरपालिका व महानगरपालिका मध्ये महिला लोकप्रतिनिधीच्या संख्येत मोठयाप्रमाणात वाढ झालेली आढळते. जगातील सर्वात मोठी लोकशाही शासनव्यवस्था असलेले राष्ट्र म्हणून भारताकडे पाहिले जाते. भारताने लोकशाही मजबूत करण्यासाठी समता, स्वातंत्र्य, न्याय व बंधुत्व या तत्वांचा स्विकार केला आहे. आशा परिस्थितीत आरक्षणाच्या आधारावर महिलांना राजकीय दृष्ट्या सक्रिय व सक्षम करण्याचा निर्णय कितपत योग्य आहे, याचा तुलनात्मक अध्ययन करताना संशोधनासाठी पुढील उद्दिष्टांचा स्विकार केला आहे.

१) ७३ व ७४ व्या घटनादुरूस्ती नंतर पंचायतराज व्यवस्थेचा अभ्यास करणे.

२) आरक्षणानंतर महिलांचा नगरपालिकेतील सहभागाबाबत झालेल्या संख्यात्मक व गुणात्मक बदल अभ्यासणे.

३) निर्णयप्रक्रियेत महिला कितपत प्रभावी ठरतात याबाबत तुलनात्मक अध्ययन करणे.

४) स्थानिक पातळीवरील लोकप्रतिनिधी म्हणून महिलांच्या राजकीय जाणीवा किती प्रगल्भ झल्या याचा अभ्यास करणे.

५) पुरूषप्रधान संस्कृतीच्या समाजव्यवस्थेत महिला प्रतिनिधींना कामाच्या ठिकाणी कितपत सहकार्य मिळते हे तपासून पहाणे.

६) स्थानिक स्वराज्य संस्थेत उच्चशिक्षीत महिलांचे प्रमाण व त्यांचा सक्रिय सहभाग अभ्यासणे.

**गृहितके :-**

गृहीतकृत्य ही विधानाच्या स्वरूपात मांडली जातात. अध्ययन विषयाशी संबंधीत समस्येची संभाव्य उत्तरे म्हणजे गृहीतकृत्ये. संशोधन विषय अध्ययन करताना पुढील गृहीतकृत्ये स्विकारण्यात आली आहेत.

१) ७३ व्या व ७४ व्या घटनादुरूस्तीमुळे ग्रामीण आणि नागरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या राजकारणात महिला सक्रीय झाल्या आहेत.

२) पुरूषप्रधान समाजसंरचनेमुळे महिलांच्या राजकीय निर्णय प्रक्रियेतील सहभागात अडचणी येतात.

३) स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांचा संख्यात्मक सहभाग अधिक व गुणात्मक सहभाग कमी आढळून येतो.

४) स्थानिक राजकारणात महिला पदाधिकारी म्हणून प्रभावीपणे कार्ये करतानां दिसत नाहीत.

५) राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व प्रवर्गीय पार्श्वभूमीवरून महिलांच्या राजकीय जाणीवा व प्रगल्भतेत फरक दिसून येतो.

६) यवतमाळ जिल्ह्यातील सुशिक्षीत महिलांचा राजकीय निर्णय प्रक्रियेतील सहभाग अधिक प्रगल्भ आणि स्वनिर्णायक आढळून येतो.

७) यवतमाळ जिल्ह्यातील नगरपालिका अध्यक्षपद भूषवितांना महिलांचा सहभाग अधिक निर्णायक ध्येयधोरणे व विकासात्मक योजना आमलात आणणारे आढळतो.

**उपलब्ध साहित्याचा आढावा :-**

७३ व्या व ७४ व्या घटनादुरूस्तीनंतर स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या नगरपालिका व महानगरपालिकामध्ये महिला अनेक पदावर विराजमान झाल्या. काही महिला राजकीय निर्णय घेताना स्वतःचे सक्ष्मत्व दाखवत आहेत. तर आजही काही महिला पुरूषप्रधान व्यवस्थेच्या परावलंबी आढळतात. यातूनच मग अशा संस्थाचा अभ्यास नव्याने सुरू झाला. त्यापैकी काही विशिष्ट संशोधकांच्या याठिकाणी उल्लेख करता येतो.

**१) डॉ.श्रीमती कमलेश शर्मा :**

यांच्यामते, ७३ व्या घटना दुरूस्तीच्या आधारे इंदौर जिल्ह्यातील मेरू व सावेर विकास खंडातील महिला प्रतिनिधींचा अभ्यास करून असे निष्कर्ष काढले की, ‘‘निवडून आलेल्या महिलांना कायद्याचे अपुरे ज्ञान असल्यामुळेच या महिला प्रभावीपणे कार्य करू शकत नाहीत.’’

**२) निलीमा भावे :**

‘राजसत्तेच्या फटीतून पेशवेकालीन स्त्रीया’ या पुस्तकात राजकीय कर्तृत्व गाजवलेल्या मराठा व पेशवा घराण्यातील स्त्रीयांची उपयुक्त माहिती आहे.

**३) साने गीता :**

‘भारतीय स्त्री जीवन’ यापुस्तकात गीता साने यांनी काळापासून ते आजच्या आधुनिक कालखंडापर्यंतच्या स्त्रीयांच्या नानाविध बंधनानी जखडलेल्या आयुष्याच्या पट उलगडा असून तीला सामोरे जाव्या लागणा-या विविध प्रश्नांची ऊहापोह केला आहे. या साहित्याचे अधिक विश्लेषण करावे व पुस्तकांचा संदर्भ नोट करावा.

**४) अशोक शर्मा :**

"Political Empowerment of Women in local Government Instutation : The case of Jaipur Muncipal Corporation" या प्रबंधात असे दिसून येते की, "जयपुर महानगरपालिकेतील महिला महिला प्रतिनिधी अकार्यक्षम होत्या. कारण पैशाच्या अभावामुळे त्या चांगल्या भूमिका पार पाडू शकल्या नाहीत."

**५) स्त्री आधार केंद्र :**

७३ व्या घटनादुरूस्तीनंतर १९९५ साली डॉ.निलम गो-हे यांच्या नेतृत्वाखालील स्त्री आधार केंद्राने पुणे, लातूर आणि उस्मानाबाद या तीन जिल्ह्यातील अनुक्रमे १२,११ आणि १९ ग्रामपंचायततील ३२ महिला प्रतिनिधीच्या अभ्यासाच्या संशोधनातून असे निष्कर्ष काढले की, "महिला प्रतिनिधीना आरक्षणांची माहिती नव्हती तसेच त्यांच्यात राजकीय जागृती नसल्याने निर्णय प्रक्रियेत सहभाग अत्यल्प असल्याने त्यांना प्रशिक्षणाची अत्यंत गरज आहे."

**६) राजकुमार :**

राजकुमार यांनी संपादित केलेल्या "वुमेन पॉलिटिक्स इन इंडिया" पुस्तकात स्थानिक संस्थेमधील महिलांच्या सहभागाचे स्वरूप, भूमिका आणि व्याप्ती याचा अभ्यास करून पुढील निष्कर्ष काढले, सहभागी महिलांची संख्या कमी असून गुणवत्ता देखिल कमी आहे. राजकिय जागृती व सहभागाच्या अभावामुळे व अकार्यक्षमतेमुळे महिला नेतृत्वाचा स्थानिक संस्थेत फारसा प्रभाव पडत नाही."

**संशोधन पध्दती :-**

"स्थानिक स्वराज्य संस्थेत महिला प्रतिनिधींचा राजकीय निर्णय प्रकियेत सहभाग : एक चिकित्सक अभ्यास." विशेष संदर्भ : यवतमाळ जिल्ह्यातील

(२००६, २०११ व २०१६) या तीन निवडणुकीत नगरपालिकेतील महिला प्रतिनिधीच्या सक्रिय सहभागाचे तुलनात्मक अध्ययन याचा अभ्यास करताना पुढीलप्रमाणे संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

**१) संशोधन शिर्षक:**

**स्थानिक स्वराज्य संस्थेत महिला प्रतिनिधीचा राजकीय निर्णय प्रक्रियेत सहभाग (विशेष संदर्भ, यवतमाळ जिल्ह्यातील नगरपालिकेतील महिला प्रतिनिधींचा अभ्यास) (२००६ ते २०१६ या कालखंडातील अभ्यास)**

**२) संशोधनाची व्याप्ती व क्षेत्र :**

- ❖ संशोधनासाठी यवतमाळ जिल्ह्यातील ८ नगरपालिका व २ नगरपंचायतचा विशेष संदर्भ म्हणून घेतला आहे.
- ❖ संशोधनासाठी २००६ ते २०१६ एवढाच कालखंड घेण्यात आला आहे.

**३) संशोधनाची पध्दती :**

संशोधनाची पध्दती हे सामजिकशास्त्र पध्दतीचे असले. या संशोधनात ग्रंथालय व क्षेत्रीय अभ्यासपध्दत या दोन्ही पध्दतीचा वापर केला जाईल. या अनुषगांने प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर अभ्यासासाठी अपेक्षित आहे.

**४) माहिती संकलन :**

संशोधनाच्या माहिती संकलनासाठी खालील स्त्रोतांचा वापर करण्यात येईल.

**अ) प्राथमिक स्त्रोत :**

**१) मुलाखत व प्रश्नावली :**

यवतमाळ जिल्ह्यातील सर्वच नगरपालिकेतील २००६ ते २०१६ या कालखंडातील तीन नगरपालिकातील नमूनानिवड पध्दती द्वारे निवडलेल्या सर्वच

प्रवर्गातील महिला लोकप्रतिनीधच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या जातील. या मुलाखती प्रश्नावलीवर आधारीत असतील.

**२) संरचीत प्रश्नावली :**

निवडक महिला लोकप्रतिनिधींना सारख्याच प्रश्नांची प्रश्नावली देण्यात येईल. प्रश्नावली मधील काही प्रश्न पर्यायी उत्तराचे तर काही प्रश्न सविस्तर उत्तर अपेक्षित असतील. याद्वारे महिला लोकप्रतिनिधीची सामजिक, राजकीय, शैक्षणिक तसेच प्रवर्गीय पार्श्वभूमि प्रतिनिधीक स्वरूपात जाणून घेणे, तसेच आरक्षण तरतूदीनुसार महिलांचे राजकारणात बदललेले स्थान, दृष्टीकोन, सक्रीयेतचा अभ्यास केला जाईल.

**ब) द्वितीय स्त्रोत :**

१) विविध संदर्भग्रंथ व ग्रंथालयातील उपलब्ध दस्तऐवज

२) विविध मासिक, दैनिक, साप्ताहिक या साहित्यातील प्रसिध्द झालेले विश्लेषणात्मक लेख.

३) शासकीय दस्तऐवज, शासनाने वेळोवेळी प्रकाशित केलेले अहवाल, गॅझेटस, निवडणूकीतील आकडेवारी दर्शविणारे शासनाचे निवडणूक अहवाल.

**५) माहिती प्रक्रियीकरण :**

माहिती संकलनानंतर मिळालेल्या माहितीचे अध्ययन, वर्गीकरण व निष्कर्षण करण्यात येईल. यात प्रामुख्याचे खालील पध्दतीचा अवलंब केला जाईल.

अ) विश्लेषण पध्दती

ब) आलेख पध्दती

क) संगणकीकरण

**६) नुमना निवड :**

संशोधनाच्या प्राथमिक स्त्रोतातील मुलाखतीसाठी महिला लोकप्रतिनिधिची निवड करण्याकरीता पुढील नुमना तंत्राचा वापर करण्यात येईल.

अ) निवड क्षेत्र ब) निवड आखणी क) नमुनानिवड तंत्र (उद्देशमुलक तंत्र) या तंत्राद्वारे ५० टक्के महिला प्रतिनिधींच्या मुलाखती घेण्यात येतील.

**संशोधन आराखडा :**

**प्रकरण**

**१) प्रस्तावना व संशोधनपध्दती :**

प्रस्तुत प्रकरणात या शोधप्रबंधासाठीचे स्वरूप उद्दीष्टये, गृहीतके, संशोधनाची अभ्यासपध्दती आणि संशोधन आराखडा विस्तृतपणे मांडण्यात येईल.

**२) यवतमाळ जिल्हा : एक दृष्टीक्षेप :**

याप्रकरणात अभ्यासविषयक असलेल्या यवतमाळ जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी, जिल्ह्याची माहिती (लोकसंख्या, क्षेत्रफळ, पर्यटनस्थळे आदि.) सर्वच नगरपालिका आस्तित्वात आल्यापासूनच राजकीय परिस्थिती स्थानिक स्वराज्य संस्थामधील महिला राखीव जागाविषयक तरतूदीनंतर जिल्ह्याच्या राजकीय समीकरणांमध्ये झालेल्या बदल आदि बाबींचा अभ्यास केला जाईल.

**३) यवतमाळ जिल्ह्यातील नगरपालिकेतील निवडणुकांचे विश्लेषण :**

२००६, २०११ व २०१६ या तीन नगरपालिका निवडणूकांचा विश्लेषणात्मक अभ्यास याप्रकरणात केला जाईल.

**४) दहा नगरपालिकेतील महिला प्रतिनिधींचा राजकीय सहभाग :**

यवतमाळ, पुसद, द्वारव्हा, उमरखेड, पांढरकवडा, वणी, दिग्रस, घाटंजी या आठ नगरपालिका आणि नेट व आर्णी या दोन नगरपंचायतीची २००६ ते २०१६ या तीन निवडणूक कालखंडातील महिला लोकप्रतिनिधींचा प्रवर्गानिहाय

संख्यात्मक सहभागाचा तासिकाद्वारे अभ्यास केला जाईल. तसेच शिक्षण, सामाजिक, राजकीय इ. पार्श्वभुमी वरून आढावा घेतला जाईल.

**५) महिला प्रतिनिधीचे राजकीय निर्णय प्रक्रियेतील योगदान :**

महिला लोकप्रतिनिधी म्हणून तसेच विशेष समिती सदस्य/अध्यक्ष म्हणून केलेल्या कार्यांचे तुलनात्मक अध्ययन केले जाईल.

**६) २००६,२०११ व २०१६ या निवडणूकांतील महिलांच्या कार्याचे तुलनात्मक अध्ययन :**

या प्रकरणात संरचित प्रश्नावलीलच्या माध्यमातून संकलित केलेली माहिती सांख्यकिय स्वरूपात संकलत करून तालीकांच्या साह्याने मांडणी केली जाईल. त्याचबरोबर प्रत्यख मुलाखत वसंबंधित महिला प्रतिनीधंशी चर्चा करतांना जे मुद्दे समोर येतील त्यांचा गोषवारा दिला जाईल. या सर्व माहितीचे विश्लेषण याप्रकरणात केले जाईल.

**७) समारोप व निष्कर्ष :**

या प्रकरणात शोधप्रबंधाच्या अभ्यासविषयाचा सारांश तसेच विश्लेषणातून प्राप्त निष्कर्षही मांडला जाईल. अखेरीस अभ्यासला उपयोगात आणलेल्या साधनांची संदर्भसूची दिलेली असेल.

# संदर्भसूची


१) भा.ल.भोळे : 'आधुनिक भारतातील राजकीय विचारक', कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७८ पृ.कृ.३०९

२) व्ही.बी.पाटील : 'महाराष्ट्रातील पंचायतराज व नागरी शासनसंस्था' के.सागर पब्लिकेशन,पुणे, प्रति.२००८ पृ.कृ.४०

३) गोविंद यमलवाड : "भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था", कल्पना प्रकाशन, नांदेड, प्र.ति.१९९९ पृ.क.५३,५४

४) डॉ.अर्जूनराव दर्शनकार : "पंचायतराज व नागरी प्रशासन", कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद जुन १९९९ पृ.कृ.१३/१४

५) डॉ.शांताराम भोगले : भारतातील स्थानिक शासन, विद्या प्रकाशन, नांदेड, प्र,ति. १९९० प्र.कृ. १७ व १८

६) डॉ.व्ही.एल.एरंडे : महिलांसाठी आरक्षण अपरिहार्य. समाज प्रबोधन पत्रिका, २००४

७) व्होरा आशाराणी : "भारत की आग्रणी महिलांचे" केंद्रीय हिंदी निदेशालय शिक्षा एवं समाजकल्याण मंत्रालय, भारत सरकार द्वारा कार्यान्वित, प्रकाशकोंकी योजना के अंतर्गत प्रकाशित, नई दिली १९७३

८) घारपुरे डॉ.ज्योत्सना : "आशा झुंजलो आम्ही",साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद १९७४

९) डॉ.पा.मा.पाटील : "संशोधन पध्दती", श्री.मंगेश प्रकाशन, नागपूर १९९८ प्र.कृ.२० ते २८ आणि १२३ ते १२८

१०) डॉ.व्ही.एल.जरारे : संशोधन पध्दती, अद्वैत प्रकाशन, अकोला २००४ प्र.कृ.४८ ते ५०, ८९ ते ९८, ११४ ते १४२

११) डॉ.अनंत जोशी व सौ.संजीवनी महाले : संशोधन अहवालाची लेखनपध्दती, य.च.मु. विद्यापीठ, नाशिक, २०००

१२) माहिती व सांख्यकिय विभाग,प्रकाशक जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, यवतमाळ जिल्हा प्र.ति. २००८

१३) देसाई निरा : "स्त्रियांचा राजकारण सहभागाविषयक काही समस्या : राजकारणत स्त्रियांचा सहभाग प्र.कृ.१४९

१४) 50% Quoto for women in panchayats, planned- The Hindu www.thehindu.com article 819455

१५) Yavatmal District Website : yavatmal.nic.in

१६) भावे निलमा :स्त्रीशक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा, राजसत्तेच्या फटीतून पेशवेकालीन स्त्रिया, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९८९, १९९९

१७) साने गीता : भारतीय स्त्रीजीवन.

१८) Ashok Sharma : "Political Empowerment of Women in local Government Instutation : The case of Jaipur Muncipal Corporation"

**(डॉ. व्ही.एल. एरंडे)**
मार्गदर्शक

**(कु.भुतडा शितल भागीरथजी)**
संशोधक विद्यार्थी
गो.सी.गावंडे क.महाविद्यालय, उमरखेड